




दैनिक

# अक्षराज

अचूक वेध,अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com








वर्ष : ०५ | अंक : २९३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.०४ जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# पावसाचा पॅटर्न बदलणार, दुष्काळ अन् उष्णतेची लाट!

## हवामान संघटनेची चिंताजनक भविष्यवाणी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, मुंबई :** देशभरात यंदा उष्णतेच्या लाटेने नागरिकांना हैराण केल्याचं पाहायला मिळालं. मान्सूनच्या आगमनादेखील विलंब झाल्याने उष्णतेने होरपळलेल्या नागरिकांना दिलासा मिळण्यास आणखी काही दिवस वाट पाहावी लागणार आहे. मान्सूनचे आगमन लांबणीवर पडल्याने शेतकरी चिंतेत असतानाच जागतिक हवामान संघटनेकडून चिंता वाढवणारी माहिती देण्यात आली आहे. जगभरात वातावरण बदलामुळे मोठं संकट निर्माण झालं असून अल निनोच्या सक्रियतेबाबत वैज्ञानिकांकडून गंभीर इशारा देण्यात आला आहे.

रॉयटर्सच्या वृत्तानुसार, अल निनोचा प्रभाव वेगाने वाढण्याची शक्यता असून परिणामी मान्सून पॅटर्न बदलणार आहे. जून ते ऑगस्ट या कालावधीत अल निनोचा प्रभाव तयार होण्याची शक्यता ८० टक्क्यांपर्यंत असून नोव्हेंबर महिन्यापर्यंत अल नीनोचा प्रभाव पाहायला मिळू शकतो. वातावरणीय बदलामुळे अल निनोचा परिणाम अधिकच तीव्रतेने जाणवण्याची शक्यता आहे. यामुळे काही भागांमध्ये दुष्काळ, उष्णतेची लाट तर काही ठिकाणी अतिवृष्टी आणि पुराचा सामना करावा लागू शकतो.



**अल निनो म्हणजे नक्की काय?**

जनसामान्यांच्या जीवनावर थेट परिणाम करणारा अल निनो हा दर दोन ते सात वर्षांनी तयार होणारा वातावरणाचा पॅटर्न आहे. या स्थितीत प्रशांत महासागराचे पाणी गरम होते, ज्यामुळे जागतिक तापमानवाढ होते आणि पावसाचा पॅटर्नही बदलून जातो.

शास्त्रज्ञांनी केलेल्या दाव्यानुसार, पृथ्वीचे तापमान अलीकडच्या काळात १.३ अंश सेल्सिअसने वाढलं असून यामुळे अल निनोचा प्रभाव आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. अल निनो आणि तापमानवाढीमुळे उष्णतेची लाट, दुष्काळ, अतिवृष्टी आणि जंगलांमध्ये आग लागण्याच्या घटनांमध्ये वाढ होण्याचा धोका आहे.

दरम्यान, यंदा अल निनोचा प्रभाव मान्सूनच्या आगमनावर झालेला असतानाच पुढील वर्षी आणखी विदारक परिणाम पाहायला मिळू शकतात. २०२७ हे आतापर्यंतचं सर्वांत उष्णतेचं वर्ष ठरण्याची शक्यता जागतिक हवामान संघटनेकडून वर्तवण्यात आली आहे.

# सोयगावच्या जुन्या बाजार चौकात भला मोठा अजगर



**अक्षराज : पुनम परदेशी**

**दि.०३, छ.सोयगाव (संभाजीनगर) :** शहरातील जुन्या बाजार चौकात व परिसरात राहणारे अतुल भोई यांच्या घरात भला मोठा अजगर आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.रात्री उशिरा घरात अचानक अजगर दिसताच कुटुंबीयांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.घटनेची माहिती मिळताच कुटुंबीयांनी शेंदुर्णी येथील सर्पमित्र कृष्ण धनगर यांच्याशी संपर्क साधला. रात्री सुमारे साडे अकराच्या सुमारास फोनवरून माहिती मिळाल्यानंतर कृष्ण धनगर यांनी तत्काळ सोयगावकडे धाव घेतली.अवघ्या काही वेळात घटनास्थळी पोहोचून त्यांनी अत्यंत सावधगिरीने आणि कौशल्याने अजगराला पकडले.अजगराला कोणतीही इजा न होता सुरक्षितपणे पकडल्यानंतर त्याला त्याच्या नैसर्गिक अधिवासात, जंगल परिसरात सोडण्यात आले. सर्पमित्राच्या तत्परतेमुळे संभाव्य धोका टळल्याने परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला.

या प्रसंगी नागरिकांनी सर्पमित्र कृष्ण धनगर यांच्या धाडसी आणि समाजोपयोगी कार्याचे कौतुक केले. वेळेवर मिळालेल्या मदतीमुळे मोठा अनर्थ टळल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

# चिचोलीत २० वर्ष जुनी पाण्याची टाकी बनली मृत्यूचा सापळा!

चिचोली वार्ड क्र. १ येथील पाणी पुरवठ्याची टाकी जुनी व जीर्ण झाली आहे वेळेत देखभाल-दुरुस्ती न झाल्यामुळे टाकीची सुरक्षितता आणि पाणीपुरवठ्यावर परिणाम होत आहे. या संदर्भात आवश्यक असलेल्या जॅकेटींग, रेलिंग, पेंटिंग आणि नवीन स्पायरल स्टेअरकेस उभारणीच्या कामाबाबत ४ फेब्रुवारी २०२६ रोजीच गटविकास अधिकारी सावनेर यांना पत्राद्वारे सविस्तर कळवले आहे. तसेच संबंधित विभाग व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणालाही याबाबतची माहिती देण्यात आली आहे.

**– पंकज दांगट,**
**ग्रामपंचायत अधिकारी, चिचोली**



- कॉलम आणि जिन्याला पडल्या प्रचंड भेगा...
- ग्रामपंचायत प्रशासनाचे हेतुपुरस्सर दुर्लक्ष...
- संबंधित विभाग कुंभकर्णी झोपेत...

**नागरिकांचा संतप्त सवाल : दुर्घटना घडल्यावर जाग येणार का?**

चिचोली ग्रामपंचायत येथे कार्यरत ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी ४ फेब्रुवारी २०२६ रोजीच वरिष्ठांना कळवले असल्याचे सांगून आपली जबाबदारी झटकली असली तरी प्रत्यक्षात जमिनीवर अजूनही कोणतीही हालचाल झालेली नाही. पत्रव्यवहार आणि कागदी घोड्यांमध्ये प्रशासन व्यस्त असताना या परिसरात राहणाऱ्या शेकडो नागरिकांच्या जीवाला मात्र थेट धोका निर्माण झाला आहे. एखादी मोठी दुर्घटना घडून जीवित हानी झाल्यावरच या कुंभकर्णी झोपेत असलेल्या प्रशासनाला जाग होणार का? असा संतप्त सवाल चिचोली वार्ड क्रमांक १ प्रासारतील नागरिक विचारत आहेत.

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०३, नागपूर :** सावनेर पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या चिचोली(खापरखेडा) ग्रामपंचायत हद्दीतील वार्ड क्रमांक १ मधील लाखो लिटर क्षमतेची पाण्याची टाकी अत्यंत जीर्ण आणि दयनीय अवस्थेत पोहोचली आहे. या पाण्याच्या टाकीचे कॉलम आणि जिन्याला मोठ्या भेगा पडल्या असून ही टाकी केव्हाही कोसळून मोठा घातपात होण्याची भीती निर्माण झाली आहे. मात्र, या गंभीर समस्येकडे चिचोली ग्रामपंचायत प्रशासनाचे हेतुपुरस्सर दुर्लक्ष होत असून संबंधित प्रशासन कुंभकर्णी झोपेत असल्याचा आरोप चिचोली वार्ड क्रमांक १ परिसरातील नागरिकांनी केला आहे.

चिचोली वार्ड क्रमांक १ परिसरात वर्ष २००५-२००६ मध्ये १ लाख ७० हजार लिटर क्षमतेच्या या पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे बांधकाम करण्यात आले होते. या बांधकामाला आता जवळपास २० वर्षे पूर्ण झाली आहेत. काळाच्या ओघात आणि योग्य देखभाली अभावी या टाकीची अवस्था कमालीची खालावली आहे.

सदर टाकीच्या माध्यमातून परिसरातील सुमारे अडीच ते तीन हजार नागरिकांना पाणीपुरवठा केला जातो. विशेष म्हणजे या पाण्याच्या टाकीच्या अगदी अवतीभवती नागरिकांची वस्ती असून लोकांची घरे आहेत. अपघात किंवा घटना सांगून येत नाही या भीतीने परिसरातील नागरिक रोज मृत्यूच्या छायेत वावरत आहेत.

केव्हाही मोठा अनर्थ ओढवू शकतो अशी भीती प्रत्यक्षदर्शींनी व्यक्त केली आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार या टाकीची तातडीने दुरुस्ती न झाल्यास पाणीपुरवठा यंत्रणा पूर्णपणे कोलमडू शकते या ठिकाणी टाकीचे जॅकेटींग, नवीन स्पायरल स्टेअरकेस,

रेलिंग आणि पेंटिंगचे काम इतर किरकोळ व अत्यावश्यक दुरुस्ती आवश्यक आहे. याप्रकरणी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ दखल घेऊन टाकीच्या दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर करावे अशी मागणी जोर धरत आहे.

# 'एमडी' चा मोठा साठा जप्त !
## नागपूरचा तस्कर चंद्रपूर एलसीबीच्या जाळ्यात

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०३, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यात अंमली पदार्थांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेला मोठे यश मिळाले असून, स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) भद्रावती हद्दीत धडक कारवाई करत तब्बल १६८.९४ ग्रॅम एम.डी. (मेफेड्रोन) ड्रग्जसह कार जप्त केली आहे. या कारवाईत नागपूर येथील एका तस्कराला अटक करण्यात आली असून, एकूण ₹१४,११,०००/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात अवैध धंदे, विशेषतः अंमली पदार्थ तस्करी रोखण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर ०२ जून रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला खात्रीशीर माहिती मिळाली की, नागपूर येथील अब्दुल सिराज अब्दुल गफ्फार हा मोठ्या प्रमाणात एम.डी. ड्रग्ज घेऊन भद्रावतीकडे येणार आहे. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वाखाली पथकाने तत्काळ कारवाईची रणनीती आखली. कायदेशीर परवानग्या पूर्ण करून नागपूर-भद्रावती मार्गावरील जमघट हॉटेल परिसरात सापळा रचण्यात आला.

०३ जून रोजी पहाटे ००:३५ वाजताच्या सुमारास संशयित पांढऱ्या रंगाची होंडा अमेझ कार घटनास्थळी पोहोचताच पोलिसांनी तात्काळ नाकेबंदी करून वाहन ताब्यात घेतले. चालकाची चौकशी केली असता त्याने आपली ओळख अब्दुल सिराज अब्दुल गफ्फार (वय ४०, रा. तुकडोजी चौक, नागपूर) अशी सांगितली. यानंतर राजपत्रित अधिकारी यांच्या उपस्थितीत वाहनाची व आरोपीची झडती घेण्यात आली असता, त्याच्या ताब्यातून १६८.९४ ग्रॅम एम.डी. ड्रग्ज पावडर (अंदाजे किंमत ₹८,५०,०००/-) आढळून आली. तसेच तस्करीसाठी वापरण्यात आलेली होंडा अमेझ कारही जप्त करण्यात आली. एकूण जप्तीची किंमत ₹१४,११,०००/- इतकी आहे. या प्रकरणी भद्रावती पोलीस स्टेशनमध्ये आरोपीविरुद्ध एन.डी.पी.एस. कायद्यांतर्गत कलम ८(क), २२(क) व २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

**कारवाईत सहभागी अधिकारी व कर्मचारी :**

पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वाखाली विनोद भुरले, सुनील गौरकार, सुभाष गोहोकार, सतीश अवथरे, रजनिकांत पुट्ठावार, दीपक डोंगरे, इम्रान खान, हिरालाल गुप्ता, किशोर वाकाटे, शशांक बदामवार आदींचा सहभाग होता.

एकूण पाहता, चंद्रपूर पोलिसांनी अंमली पदार्थांविरोधात आक्रमक भूमिका घेतल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले असून, जिल्ह्यातील ड्रग्ज नेटवर्कवर मोठा आघात झाल्याची चर्चा आहे.


# दारूबंदी आदेश मोडणाऱ्यांवर राहुरी पोलिसांचा दणका; जामीनदारांच्या ७/१२ वर १ लाखांचा बोजा

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०३, राहुरी :** राहुरी पोलीस स्टेशन हद्दीत अवैध दारू विक्रीला आळा घालण्यासाठी सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत राहुरी पोलिसांनी महत्त्वपूर्ण कारवाई केली आहे. दारूबंदी कायद्याचे वारंवार उल्लंघन करणाऱ्या १० अवैध दारू विक्रेत्यांनी दिलेल्या बाँडच्या अटींचा भंग केल्याने त्यांच्या जामीनदारांच्या ७/१२ उताऱ्यावर प्रत्येकी १ लाख रुपयांचा बोजा चढविण्यात आला आहे.

पोलीस प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, सन २०२५ व जानेवारी ते मे २०२६ या कालावधीत राहुरी पोलीस स्टेशन हद्दीत अवैध दारू विक्रीसंदर्भात एकूण ३७५ गुन्हे दाखल करण्यात आले होते. यापैकी तीनपेक्षा अधिक गुन्हे दाखल असलेल्या १५५ अवैध दारू विक्रेत्यांविरोधात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या कलम ९३ अन्वये प्रस्ताव पाठवून प्रत्येकी १ लाख रुपयांचे बाँड घेण्यात आले होते.

मात्र, बाँड दिल्यानंतरही १० विक्रेत्यांनी पुन्हा अवैध दारू विक्री करून बाँडच्या अटींचे उल्लंघन केले. याची गंभीर दखल घेत माननीय प्रांताधिकारी, श्रीरामपूर यांनी




संबंधित विक्रेत्यांना प्रत्येकी १ लाख रुपये दंड भरण्याचे आदेश दिले होते. मात्र आरोपींनी दंडाची रक्कम न भरल्याने कायदेशीर प्रक्रियेनुसार त्यांच्या जामीनदारांच्या मालमत्तेच्या ७/१२ उताऱ्यावर शासनाच्या वसुलीचा बोजा नोंदविण्यात आला आहे. कारवाई झालेल्या अवैध दारू विक्रेत्यांमध्ये कैलास रामचंद्र कुसमुडे (वांबोरी), मोहन भागवत बोरुडे (कुरणवाडी), दिलीप अंबादास कुसमुडे (वांबोरी), काशिनाथ अंबादास चव्हाण (तांदुळवाडी), दीपक मधुकर पडघलमल (सत्रळ), नितीन साहेबराव मुंतोडे (चिंचाळे), नवनाथ जोतिराम वाघ (राहुरी), जनार्दन रंगनाथ पवार (मानोरी), माणिक चंद्रभान पवार (वळण) व अशोक सूर्यभान गुंजाळ (देवळाली प्रवरा) यांचा समावेश आहे.

याबाबत राहुरी पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले असून, कोणत्याही आरोपीस जामीन देताना तो संबंधित नियम व अटींचे पालन करेल याची खात्री करूनच जामीनदार व्हावे. अन्यथा आरोपीकडून अटींचे उल्लंघन झाल्यास जामीनदारांच्या मालमत्तेवर शासनाच्या वसुलीचा बोजा चढविण्यात येऊ शकतो, असा इशाराही देण्यात आला आहे.

सदर कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ठेंगे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या कारवाईचा पाठपुरावा पोलीस उपनिरीक्षक गणेश वाघमारे, समाधान फडोळ, राजेंद्र जाधव तसेच पोलीस अंमलदार सूरज गायकवाड, राहुल यादव, गणेश मैड, सचिन कोळी व वृषाली कुसळकर यांनी केला.

# दुचाकींच्या समोरासमोरील धडकेत एकाचा मृत्यू





**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०३, गोंडपिंपरी (चंद्रपूर) :** अहेरी - चंद्रपूर राष्ट्रीय महामार्गावरील धानापूर फाट्याजवळ मंगळवारी दि.२ जुनला सकाळी १० वाजताच्या सुमारास दोन दुचाकींची समोरासमोर भीषण धडक झाली. धडकेत एका दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य तिघेजण गंभीर जखमी झाले आहेत. रोशन वसंत लोहट (३४, रा. चारगाव, चेक ता. नागभीड) असे मृतकाचे नाव आहे. जखमींना जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

चारगाव येथील रोशन लोहट हे करंजी येथील त्यांच्या सासुरवाडीला आले होते. मंगळवारी सकाळी ते त्यांचे मित्र चुडामणी माधव मडावी व खुशाल मडावी यांच्यासह दुचाकीने (एमएच-३४ एसी-३३२५) गोंडपिपरीकडे जात होते. दरम्यान, धानापूर फाट्याजवळ समोरून येणाऱ्या राम विजय मराठे (रा. गोंडपिपरी) यांच्या दुचाकीशी समोरासमार जोरदार धडक झाली. या धडकेत रोशन लोहट यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर इतर तिघे जण गंभीर जखमी झाले. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक रमेश हत्तीगोटे यांच्या मार्गदर्शनात सुरजागडचे पेट्रोलिंग अधिकारी प्रदीप येल्लुरे, सहायक फौजदार देवाजी निखाडे, पोलीस कर्मचारी सचिन झाडे व प्रवीण कडुकर यांनी रुग्णवाहिका बोलवून जखमींना चंद्रपूरला हलविले.

## संपादकीय



### मणिपूरचे खरे दुखणे

सध्या ईशान्य भारत व पूर्वेकडील राज्यांची जोरदार चर्चा सुरू आहे ती तेथील अंमली पदार्थांच्या तस्करीमुळे. आसाम, त्रिपुरा, मणिपूर येथे कोट्यवधी रुपयांचे अमली पदार्थ जप्त केल्याच्या बातम्या येत आहेत. त्यावर उपाय म्हणून केंद्रीय गृहमंत्र्यांनी, 'देशातून माओवादाचा जसा बीमोड केला, तसा सन २०४७पर्यंत अंमली पदार्थांचा व्यापार व तस्करीचा बीमोड केला जाईल,' अशी घोषणा केली आहे. परंतु, मुळात अमली पदार्थांची ही समस्या कशी निर्माण झाली आहे, त्याचे आजचे स्वरूप किती खोलवर रुजलेले आहे, हे जोपर्यंत समजून घेतले जात नाही तोपर्यंत त्यावर उपाय योजणे कठीण आहे. अमली पदार्थ व्यापार, त्यांची तस्करी या समस्येची पाळेमुळे वसाहतवादी इतिहास, वांशिक संघर्ष, आणि सीमावर्ती प्रदेशाचा भूगोल यांत सापडतात. त्यांचा अमली पदार्थांच्या व्यापाराशी आणि त्यातून निर्माण झालेला दहशतवाद, हिंसाचार या सर्वांशी जवळचा संबंध आहे. आज मणिपूरचा संघर्ष वरवर जरी अल्पसंख्यांक- बहुसंख्यांक, आतले- बाहेरचे किंवा हिंदू- ख्रिश्चन यातून सुरू असल्याचे दाखवले जात असले तरी त्यामागे प्रत्यक्ष वेगळेच कारण आहे. प्रशासकीय सोयीसाठी ब्रिटिशांनी पश्चिम बंगालमधून आसाम वेगळे केले. आसाममधून नंतर मेघालय, अरुणाचल प्रदेश, नागालँड, मिझोरम निर्माण झाले. त्रिपुरा आणि मणिपूर ही आधीपासून स्वतंत्र राज्ये होती. यातील बहुतेक राज्ये आदिवासीबहुल आहेत. ईशान्येकडील राज्यांची भौगोलिक रचना बघता तिथे सगळे इथलेच मूळ रहिवासी आहेत. त्यांची स्वत:ची अशी स्वतंत्र ओळख आहे. पण या सर्व राज्यांना जगण्यासाठी स्वत:शी आणि इतरांशी सतत संघर्ष करावा लागतो आहे. मग तो आर्थिक असो, सामाजिक-सांस्कृतिक असो, धार्मिक असो की भू-राजकीय. या सर्व राज्यांच्या सीमा आंतरराष्ट्रीय सीमांशी जोडलेल्या आहेत. या आंतरराष्ट्रीय सीमाही अशांतच आहेत. याचाच फायदा आज वेगवेगळ्या पातळ्यांवर घेतला जात आहे. सीमावर्ती भागातले लोक हे परस्परांशी इतके जोडलेले आहेत की जगण्याचे प्रश्न सोडवताना रोज आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडणे अगदी सहज घडते. पण याचाच फायदा राजकारणी, कट्टरतवादी घेतात. ते दीर्घकाळ आपल्याच देशात राहणाऱ्यांना घुसखोर, दहशतवादी, निर्वासित ठरवून त्यांच्या विरुद्ध कारवाईची मागणी लावून धरत आहेत. याचाच फायदा देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय पातळीवरील अमली पदार्थांचा व्यापार व तस्करी करणारे घेत आहेत. आपल्याकडच्या वाढत्या कट्टरतावादामुळे अनेकांचे रोजगार गेले आहेत. सततची अस्थिरता, भीती, दबावाचे राजकारण यामुळे अस्वस्थता आहे. असमतोल विकासामुळे काही भागांत सर्व सुविधा सहजपणे उपलब्ध आहेत, तर काही भगात त्यांचा अभाव दिसतो. आज ईशान्येकडील या सर्व राज्यांमध्ये संघर्षाचे वरवरचे कारण वेगळे दाखवले जाते आहे; पण छुपे कारण वेगळे आहे. आपण मणिपूरच्या उदाहरणावरून हे जाणून घेऊ शकतो. मणिपूरमधील संघर्ष हा सरकारपुरस्कृत आहे, असे अनेक अभ्यासक, पोलिस अधीक्षक पदावरून निवृत्त झालेले, प्रशासनातील अधिकारी, पत्रकार अशा अनेकांचे मत आहे. मैतेई-कुकींमध्ये परस्पर अविश्वास निर्माण केला गेला. बंडखोरांना हाताशी धरून पहाडी भागातल्या कुकी- झो यांच्याविरुद्ध इंफाळमध्ये एक मोठा मोर्चा काढून त्यामध्ये पहाडी समुदायांना घुसखोर, बेकायदा अफूची शेती करणारे, मादक पदार्थांची तस्करी करणारे, बेकायदा निर्वासित ठरवून त्यांच्या विरोधी कठोर कारवाई करण्याची भूमिका मांडली गेली. हे सारे सरकारच्या मान्यतेने सुरू होते. माजी विशेष सहाय्यक पोलिस अधीक्षक थॉन्गमीन थाउनाओजम यांनी 'न्यू द ट्रूथ ला दिलेल्या मुलाखतीत मांडलेली भूमिका मणिपूरमधील हिंसाचारावर व राज्य सरकारच्या भूमिकेवर प्रकाश टाकते. अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांना राज्य सरकार कसे वाचवते आहे, हे त्यांनी स्पष्टपणे दाखवले. त्या स्वत: अतिशय धडाडीच्या अधिकारी म्हणून प्रसिद्ध होत्या. अमली पदार्थ व्यापार व तस्करीला आळा घालण्याचे काम केल्यामुळे त्यांचा सरकारकडून मोठा गौरवही झाला. पण एका कारवाईत त्यांनी सरकारमधीलच वरिष्ठ पदावरील व्यक्तीच्या नातेवाईकावर कडक कारवाई केल्यावर त्यांना अतिशय अपमानास्पद पद्धतीने राजीनामा देण्यास भाग पाडण्यात आले.

माजी विशेष पोलिस अधीक्षक आणि नार्कोटिक्स व सीमा सुरक्षा अधिकारी यांनी स्पष्टपणे मांडले, की सरकारने आत्तापर्यंत अमली पदार्थ निर्मिती, व्यापार, तस्करी याविरुद्ध कधीही थेट मोहीम उघडली नाही. उलट राज्य व केंद्र सरकारमधले लोकप्रतिनिधी या सर्व व्यवहारात सहभागी असल्याने ते या व्यवहारांना संरक्षण देतात, त्यांचे आश्रयदाते बनतात. मणिपूरमधल्या सध्याच्या हिंसाचाराला अमली पदार्थांचा व्यवहार करणारे माफिया जबाबदार आहेत. म्यानमार आणि मणिपूरला जोडणारे सहा राष्ट्रीय महामार्ग आहेत. मणिपूरची सीमा म्यानमार देशाला लागून आहे. म्यानमार हा जगातील सर्वांत मोठ्या बेकायदा अमली पदार्थ उत्पादक क्षेत्रांपैकी एक आहे. म्यानमारमधून मणिपूरच्या खुल्या सीमेद्वारे मोठ्या प्रमाणावर हेरॉईन आणि याबा यांसारख्या अमली गोळ्यांची भारतात तस्करी केली जाते. सीमेवर असलेली सुरक्षा भेदून सहजपणे अमली पदार्थांचा व्यवहार चालतो. नार्कोटिक्स नियंत्रण बोर्ड अतिशय कुचकामी आहे. या ठिकाणी काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना सरकारच्या दबावाखाली काम करावे लागते.

**- डॉ. नीता साने**

# विनोद सम्राट ; पद्मश्री अशोक सराफ

मराठी चित्रपट सृष्टीतील जेष्ठ विनोदी अभिनेते, विनोद सम्राट, चित्रपट सृष्टीचे मामा, पद्मश्री अशोक सराफ यांचा आज ७९ वा वाढदिवस. विनोदाचा हा सम्राट बघता बघता ७९ वर्षाचा झाला यावर रसिकांचा विश्वास बसणे कठीण असले तरी ते सत्य आहे. अशोक सराफ यांचा जन्म ४ जून १९४७ रोजी मुंबईत झाला. मूळचे बेळगावचे असणारे अशोक सराफ यांचे बालपण मुंबईतील चिखलवाडी भागात गेले. त्यांचे शिक्षण मुंबईतील डि. जि. टी विद्यालयात झाले. लहानपणापासूनच त्यांना अभिनयाची आवड होती. वयाच्या अठराव्या वर्षी त्यांनी ययाती आणि देवयानी या नाटकात विदुषकाची भूमिका साकारली होती. दादा कोंडके यांच्या पांडू हवालदार या चित्रपटाद्वारे त्यांनी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला.



या चित्रपटातील त्यांनी साकारलेली इरसाल हवालदाराची भूमिका खूप गाजली. दादा कोंडके यांच्याच राम राम गंगाराम या चित्रपटात त्यांनी म्हमद्या खाटीक ही भूमिका साकारली. कारकिर्दीच्या सुरवातीलाच केलेल्या विनोदी भूमिका लोकप्रिय ठरल्याने त्यांना विनोदी भूमिकाच मिळत गेल्या आणि त्यांनीही त्या भूमिकांना न्याय देऊन प्रेक्षकांना खळखळून हसवले. ८० च्या दशकात लक्ष्मीकांत बेर्डे यांच्या समवेत त्यांची जोडी जमली. पडद्यावरील अशोक सराफ आणि लक्षा या जोडीने मराठी चित्रपटसृष्टित अक्षरशः धुमाकूळ घातला. या दोघांनी एकत्र अभिनय केलेल्या अशी ही बनवाबनवी, धुमधडाका, दे दणादण यासारख्या चित्रपटांनी धमाल उडवून दिली. सचिन आणि महेश कोठारे या दिग्दर्शकांनी दिग्दर्शित केलेले व अशोक सराफ यांनी अभिनय केलेले नवरी मिळे नवऱ्याला, आत्मविश्वास, गंमत जंमत, आयत्या घरात घरोबा शुभ मंगल सावधान, आई नंबर वन, एक शेर दुसरी सव्वाशेर , नवरा पावशेर, नवसाचा नवरा, आयडीयाची कल्पना हे चित्रपट देखील लोकप्रिय झाले. अशोक सराफ यांनी केवळ विनोदी भूमिकाच केल्या असे नाही तर काही गंभीर भूमिका देखील केल्या. वजीर चित्रपटात त्यांनी साकारलेला गंभीर राजकारणी भाव खाऊन गेला तर चौकट राजा चित्रपटातील त्यांनी साकारलेली सहृदय व्यक्तीची भूमिका लोकांच्या मनात घर करून गेली.

अशोक सराफ यांनी अभिनय केलेले आई नंबर वन, आत्मविश्वास, नवरी मिळे नवऱ्याला, धुमधडाका, गंमत जंमत, माझा पती करोडपती, दे दणादण, एक डाव भुताचा, भुताचा भाऊ, शेजारी शेजारी, एक उनाड दिवस, अफलातून, गोंधळात गोंधळ, अशी ही बनवाबनवी, सगळीकडे बोंबाबोंब, आयत्या घरात घरोबा, कुंकू, घनचक्कर, वजीर, एकापेक्षा एक, अनपेक्षित, चंगू मंगू , शुभमंगल सावधान, आमच्या सारखे आम्हीच, बाळाचे बाप ब्रह्मचारी, प्रेम करूया खुल्लम खुल्ला, गोष्ट धमाल नाम्याची, पांडू हवालदार, राम राम गंगाराम, कळत नकळत, अरे संसार संसार, आपली माणसं, एक डाव धोबीपछाड, आयडीयाची कल्पना, साडे माडे तीन हे त्यांनी अभिनय केलेले चित्रपट विशेष गाजले. त्यांनी केवळ मराठीच नाही तर हिंदी चित्रपटातही काम केले. करण अर्जुन, कुछ तुम कहो कुछ हम कहे, बडे घर की बेटी, बेटी नंबर वन, कोयला, गुप्त , संगदिल सनम, प्यार किया तो डरणा क्या?, जोरू का गुलाम, खूबसुरत, यस बॉस, सिंघम या हिंदी चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका विशेष लक्षात राहण्यासारख्या आहेत. हम पांच, टना टन टन, डोन्ट वरी, हो जायेगा, छोटी बडी बाते यासारख्या काही टीव्ही मालिका देखील त्यांनी केल्या. त्यांनी भूमिका केलेले हमीदा बाईची कोठी, अनधिकृत मनोमिलन, हे राम, कार्डिओग्राम, सारखं छातीत दुखतंय ही नाटकेही खूप गाजली. चित्रपट, टीव्ही, रंगमंच अशा तिन्हीं माध्यमातून त्यांनी आपल्या अभिनयाची मुशाफिरी केली. आपल्या कारकिर्दीत त्यांनी २०० हुन अधिक चित्रपटात भूमीका केल्या. रंजना, उमा भेंडे, प्रेमा किरण, निवेदिता जोशी, वर्षा उसगावकर, अश्विनी भावे, अलका कुबल, प्रिया बेर्डे, किशोरी शहाणे या आणि अशा अनेक अभिनेत्रींसोबत त्यांनी भूमिका केल्या. विशेष म्हणजे या सर्व अभिनेत्री त्यांना सेटवर मामा म्हणत. आज तर ते संपूर्ण चित्रपट सृष्टीचे मामा झाले आहेत. आज त्यांना अशोक मामा याच नावानेच ओळखले जाते. अशोक सराफ यांना अशोक मामा हे नाव कसे पडले हे पाहणे देखील रंजक आहे.

एका चित्रपटाच्या सेटवर प्रकाश शिंदे नावाच्या कॅमेरामन सोबत त्यांची मुलगी येत असत. सेटवर आली की ती विचारत असे, हे कोण ? त्या कॅमेरामनने सांगितले हे अशोक सराफ पण तू यांना मामा म्हणायचे. त्या मुलीसोबत सेटवरील सर्वजण त्यांना मामा म्हणू लागले पुढे हेच नाव रुढ झाले आणि अशोक सराफचे अशोक मामा बनले. अशोक सराफ यांना मागीलवर्षी पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले. भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांनी त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान केला. अशोक मामांना पद्मश्री पुरस्कार मिळाल्यावर संपूर्ण महाराष्ट्रात आनंदोत्सव साजरा करण्यात आला होता. जगभरातील मराठी माणसांनी त्यांना पद्मश्री मिळाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या होत्या. अशोक मामांना अभिनयासाठी मिळालेला हा पहिला पुरस्कार नाही. याआधीही त्यांच्या अभिनयासाठी त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

मात्र ते नेहमी म्हणतात की प्रेक्षकांच्या मनात मी स्थान निर्माण करू शकलो हाच माझ्यासाठी सर्वोत्तम पुरस्कार आहे आणि ते सत्यही आहे. अशोक सराफ यांच्यावर मराठी प्रेक्षकांनी जितके प्रेम केले तितके कोणत्याच अभिनेत्यावर केले नसेल. जवळपास पाच दशके आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात आढळ स्थान निर्माण करून प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या या विनोदाच्या अभिनय सम्राटाला ७९ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! परमेश्वर त्यांना उदंड आयुष्य देवो हीच परमेश्वर चरणी प्रार्थना!!

**वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा**
**अशोक मामा!!!**

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# ताटातील एका घासाने विचारायला भाग पाडलेला प्रश्न!

आपण दररोज जेवतो. ताटातील अन्न खातो. चव, पोषणमूल्य आणि किंमतीबद्दल बोलतो. पण आपल्या ताटात आलेल्या त्या एका घासामागे किती मोठी कथा दडलेली असते, याचा विचार आपण किती वेळा करतो?

काही दिवसांपूर्वी साधे जेवण करत असताना हाच विचार माझ्या मनात आला. ताटातील भात, भाजी, डाळ आणि मसाले यांचा प्रवास माझ्यापर्यंत पोहोचण्याआधी कितीतरी टप्प्यांतून झाला होता. त्या अन्नामागे एक शेतकरी होता, ज्याला मी कदाचित कधी भेटणारही नाही. त्यामागे ती माती होती, जिला मी कधी स्पर्श




केला नसेल. त्यामागे पाऊस होता, ज्यावर कोणाचेही नियंत्रण नाही. त्यामागे असंख्य सूक्ष्म जीव, पक्षी, कीटक आणि निसर्गाच्या अदृश्य व्यवस्था होत्या, ज्या शांतपणे आपले काम करत राहिल्या.

माझे जेवण अवघ्या काही मिनिटांत संपले. पण त्या अन्नामागचा प्रवास अनेक महिन्यांचा होता.

याच जाणिवेने एक अस्वस्थ करणारा प्रश्न मनात उभा राहिला ‐ आपण अन्न खातो, पण अन्न निर्माण करणाऱ्या व्यवस्थांशी आपले नाते कितपत उरले आहे?

आज आपण अन्नाच्या किमतीबद्दल बोलतो, पण मातीच्या आरोग्याबद्दल क्वचितच बोलतो. पाण्याच्या टंचाईची चर्चा करतो, पण पिकांना जीवन देणाऱ्या जलचक्राबद्दल फारसा विचार करत नाही. अन्नाच्या गुणवत्तेची चिंता करतो, पण जैवविविधता आणि परागीकरण करणाऱ्या जीवांचे महत्त्व आपल्या चर्चेतून अनेकदा गायब असते.

गेल्या काही वर्षांत शेतकरी आणि ग्रामीण समुदायांशी संवाद साधताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली. शेतकरी अन्नाकडे बाजारातील वस्तू म्हणून पाहत नाही; तो त्याकडे संघर्ष, परिश्रम आणि अनिश्चिततेच्या रूपात पाहतो.

कार्यालयातील कर्मचारी वेळेच्या मर्यादांबद्दल चिंतित असतो. व्यापारी बाजारातील चढ-उतारांबद्दल विचार करतो. पण शेतकरी पावसाबद्दल चिंतित असतो. तो मातीबद्दल विचार करतो. तो पाण्याच्या उपलब्धतेची काळजी करतो. कारण त्याचे जीवन अजूनही निसर्गाच्या लयीत चालते.

शहरी समाज आणि शेती यांच्यातील अंतर केवळ भौतिक नाही; ते भावनिक आहे.

आजची मुले अनेक ब्रँड्स सहज ओळखतात, पण अनेकांना पिके ओळखता येत नाहीत. मोबाईलवर अन्न मागवण्याची प्रक्रिया त्यांना माहिती असते, पण ते अन्न कोणत्या परिस्थितीत पिकवले गेले, याची कल्पना नसते. ही दरी वाढत चालली आहे. आणि हीच दरी चिंतेची बाब आहे.

कारण जेव्हा माणूस एखाद्या गोष्टीच्या उगमाशी असलेले नाते गमावतो, तेव्हा त्या गोष्टीचे खरे मूल्यही त्याला समजेनासे होते.

भविष्यातील पिढ्यांविषयी विचार करताना हा प्रश्न अधिक गंभीर वाटतो. आपण आपल्या मुलांना चांगले शिक्षण, आधुनिक तंत्रज्ञान आणि उत्तम संधी द्यायच्या स्वप्नात असतो. पण त्यांना सुपीक माती मिळेल का? स्वच्छ पाणी मिळेल का? अन्ननिर्मितीला आधार देणारी जैवविविधता टिकून राहील का? समाजाला पोसणाऱ्या नद्या जिवंत राहतील का?

**हे केवळ पर्यावरणाचे प्रश्न नाहीत. हे अस्तित्वाचे प्रश्न आहेत.**

पर्यावरणाविषयीच्या चर्चा अनेकदा तांत्रिक भाषेत अडकतात. त्यामुळे सामान्य माणूस त्यापासून दूर जातो. पण अन्न ही अशी गोष्ट आहे जी प्रत्येकाला जोडते. आपण कोणत्याही भाषेत बोलत असू, कोणत्याही व्यवसायात असू किंवा जगाच्या कोणत्याही भागात राहत असू ‐ प्रत्येकजण अन्नावर अवलंबून आहे. आणि प्रत्येक घास निसर्गाच्या संतुलित व्यवस्थांवर अवलंबून आहे.

**सत्य अत्यंत साधे आहे.**

सुपीक मातीची जागा कोणत्याही तंत्रज्ञानाने घेतलेली नाही. पावसाची जागा कोणत्याही यंत्राने घेतलेली नाही. जैवविविधतेची जागा कोणत्याही नवकल्पनेने घेतलेली नाही. निसर्ग हीच मानवी संस्कृतीची मूळ पायाभूत व्यवस्था आहे.

तरीही आपण अनेकदा या व्यवस्था कायम स्वरूपी आहेत, असे गृहित धरतो.

इतिहास मात्र वेगळी गोष्ट सांगतो. पर्यावरणीय मर्यादांकडे दुर्लक्ष करणाऱ्या समाजांना त्याची किंमत मोजावी लागली आहे. निसर्ग संयमी असतो, पण तो प्रामाणिकही असतो. आजच्या कृतींचे परिणाम उद्या दिसतीलच असे नाही; ते अनेक वर्षांनी किंवा दशकांनंतर दिसू शकतात.

माझ्या पर्यावरणीय प्रवासाने एक गोष्ट स्पष्ट केली आहे ‐ समाजासमोरील सर्वात मोठे आव्हान माहितीचा अभाव नाही; तर भावनिक जोडलेपणाचा अभाव आहे.

माणूस ज्या गोष्टीचे मूल्य जाणतो, तिचे संरक्षण करतो. मूल्य त्यालाच वाटते ज्याला तो समजून घेतो. आणि समज त्यालाच येते ज्याचा तो अनुभव घेतो.

कदाचित म्हणूनच माझे विचार पुन्हा पुन्हा ताटातील त्या साध्या जेवणाकडे परत जातात.

कारण त्या एका ताटामध्ये माती, पाणी, जैवविविधता, शेतकरी, हवामान आणि ग्राहक यांना जोडणारी एक अदृश्य कथा दडलेली असते. ती कथा आपल्याला आठवण करून देते की मानव आणि निसर्ग हे वेगळे नाहीत.

जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने मोहिमांपेक्षा एक भावना अधिक महत्त्वाची वाटते ‐ कृतज्ञतेची.

जीवनाला आधार देणाऱ्या अदृश्य व्यवस्थांबद्दल कृतज्ञता.

अनिश्चिततेतही अन्न पिकवणाऱ्या शेतकऱ्यांबद्दल कृतज्ञता.

आणि आपण घेतो त्यापेक्षा कितीतरी अधिक देणाऱ्या पृथ्वीबद्दल कृतज्ञता.

या लेखाच्या शेवटी वाचकांच्या मनात एकच प्रश्न राहावा अशी अपेक्षा आहे ‐

उद्याच्या पिढ्या जेव्हा जेवायला बसतील, तेव्हा त्या ताटातील अन्न शक्य करणारी पृथ्वी कशी असेल?

या प्रश्नाचे उत्तर आज आपण घेत असलेल्या छोट्या-छोट्या निर्णयांमध्ये दडलेले आहे.

अगदी आपल्या ताटातील प्रत्येक घासामागे दडलेल्या अदृश्य प्रवासाप्रमाणे.

**- विजयकुमार कट्टी**
**मो.७९७७५१३८२२**

## डोकेदुखी

बंडोबा करायचे थंड
हीच मोठी डोकेदुखी
जे जे होणारं यशस्वी
तेच गड अभेद्य राखी

भाऊ लाडका म्हणत
बहिणी बांधती राखी
चढवून ठेवा अहंकार
बाबातुम्ही पाठीराखी

वेळ अति महत्वपूर्ण
करत रहावे देखरेखी
रोखायला हे अस्वस्थ
सुस्पष्टते योजनारेखी

टिपूनि असली पाखरे
आश्वासने दाणे टाकी
स्थीर स्थावर झालेवर
चुकती करावी बाकी

बंडखोर घातक भारी
दम आणती बा नाकी
घेवू नकात हलक्यात
भोवणारं जराशीचुकी

आपले महत्त्व दाखवू
रे येणारंसर्वांस हुक्की
अवघड जागी बरोबर
चिकटून ठेवी चिक्की

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वृत्त, अचूक बातमी

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## महिला शिक्षकांची परवड; कोक जिल्हा परिषद शाळेत शौचालय नसल्याने दुसऱ्यांच्या घरी जाण्याची वेळ

# प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे महिला कर्मचाऱ्यांचा संयम संपला

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०३, जिंतूर (परभणी) :** शिक्षणाच्या मंदिरात विद्यार्थ्यांना स्वच्छता, आरोग्य आणि शिस्तीचे धडे दिले जात असताना जिंतूर तालुक्यातील कोक येथील जिल्हा परिषद शाळेतच मूलभूत सुविधांचा गंभीर अभाव असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. उर्दू आणि मराठी शाळेत जवळपास ९० टक्के महिला कर्मचारी कार्यरत असूनही त्यांच्या वापरासाठी स्वतंत्र व सुस्थितीत शौचालयाची व्यवस्था नसल्याने महिला शिक्षकांना अक्षरशः मनस्ताप सहन करावा लागत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, शाळेतील शौचालय व स्नानगृह अनेक वर्षांपासून निकामी अवस्थेत असून त्याची दुरुस्ती किंवा नव्याने उभारणी करण्याकडे संबंधित यंत्रणांनी दुर्लक्ष केले आहे. परिणामी महिला शिक्षकांना नैसर्गिक विधीसाठी गावातील नागरिकांच्या घरांचा आधार घ्यावा लागत असल्याचे वास्तव समोर आले आहे. एका बाजूला महिला सन्मान आणि महिला सक्षमीकरणाच्या घोषणा केल्या जात असताना दुसऱ्या बाजूला महिला शिक्षकांवर अशी वेळ येणे हे प्रशासनाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे.

स्वच्छ भारत अभियानाचे दावे फेल? केंद्र व राज्य शासनाकडून स्वच्छता अभियानावर कोट्यवधी रुपये खर्च केले जात आहेत. शाळांमध्ये स्वच्छता, आरोग्य आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या घोषणा वारंवार केल्या जातात. मात्र कोक येथील जिल्हा परिषद शाळेची परिस्थिती पाहता या सर्व योजना आणि दावे कागदोपत्रीच असल्याचे चित्र दिसून येत आहे.

ग्रामपंचायतीच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, शाळेतील शौचालय व बाथरूमचा प्रश्न नवीन नसून गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे महिला शिक्षकांना गावातील नागरिकांच्या घरी व पुरुष शिक्षकांना उघड्यावर बसावा लागतो. याबाबत अनेकदा ग्रामपंचायत, शिक्षण विभाग आणि संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करण्यात आला. मात्र आजपर्यंत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे या प्रश्नाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याचाही प्रश्न हा विषय केवळ शिक्षकांच्या गैरसोयीपुरता मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेशी देखील संबंधित आहे. शाळेत स्वच्छ व सुरक्षित शौचालयाची सुविधा नसल्यामुळे विद्यार्थ्यांनाही विविध अडचणींना सामोरे जावे लागत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक असल्याचे पालकांचे मत आहे.

प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करावा महिला शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांनी जिल्हा परिषद प्रशासन, शिक्षण विभाग आणि पंचायत राज विभागाकडे मागणी केली आहे की, कोक जिल्हा परिषद शाळेतील शौचालय व बाथरूमचा प्रश्न प्राधान्याने सोडवून महिला कर्मचाऱ्यांना दिलासा द्यावा. तसेच अनेक वर्षे प्रकरण प्रलंबित का राहिले, याची चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. सोशल मीडियात सुद्धा हा मुद्दा गाजत आहे गावातील वॉट्सअप ग्रूप असो फेसबुक इन्स्टाग्राम असो शेख आवेज शेख आझम व सय्यद समीर सय्यद कादर व गावातील काही जागरूक नवयुवक सोशल मिडियाच्या निवेदनाच्या माध्यमातून शासनाकडे पाठपुरावा करून हा प्रश्न लवकर मार्गी लावण्याचा प्रयत्न करत आहेत गावातील शाळा हे सर्वांसाठी आहे हे सुधारली तर गाव सुधरेल अशी ऊर्जा नावयुवका मध्ये आली आहे.

## थोडक्यात

### पंचायत विस्तार अधिकारी बैलनवार यांचा सत्कार

**अक्षराज : वसंत वडस्कर**




**दि.०३, विसापूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर पंचायत समितीचे पंचायत विस्तार अधिकारी दिलीप बैलनवार यांनी दिर्घ सेवा दिली. त्यांच्या सेवानिवृत्ती बद्दल बल्लारपूर पंचायत समितीच्या राजे खांडक्या बल्लाळशाह सभागृहात सपत्निक सत्कार समारंभ नुकताच पार पडला. यावेळी पंचायत समितीच्या वतीने भेटवस्तू, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ प्रदान भावनिक वातावरणात निरोप देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी धनंजय साळवे होते. यावेळी सत्कार मूर्ती दिलीप बैलनवार, कृषी विस्तार अधिकारी नितीन ढवस, आरोग्य विस्तार अधिकारी साहेबराव पवार, कृषी अधिकारी विवेक उमरे, सहाय्यक प्रशासनिक अधिकारी सरिता उरकुडे, उपअभियंता श्रद्धा जयस्वाल, कनिष्ठ अभियंता थामेश्वरी ठाकरे, बाल विकास प्रकल्प अधिकारी शुभांगी वर्हाटे यांची उपस्थिती होती.

यावेळी गटविकास अधिकारी धनंजय साळवे म्हणाले, शासकीय सेवेत दिलीप बैलनवार यांनी प्रामाणिक सेवा दिली. त्यांनी सेवा बजावताना मतभेदाला थारा दिला नाही. नियमानुसार सेवा कसी पार पाडावी,याचा वस्तू पाठ सेवा काळात अनुभवता आला. त्यांची सेवा बजावतानाची कार्य शैली पंचायत समितीत कार्य करणाऱ्यांना प्रेरणा निर्माण करणारी होती. त्यांच्या सेवेचा अनुभव प्रत्येकाला जमणार नाही. पण आपल्याला ते कार्य त्यांच्या अनुपस्थित पार पाडावे लागणार आहे, असे त्यांनी मनोगत व्यक्त केले. दरम्यान दिलीप बैलनवार यांनी पंचायत समितीत घालविला कार्यकाळ आपल्या सदैव स्मरणात राहील, असे सत्काराला उत्तर देताना सांगितले. कार्यक्रमाचे संचालन साहेबराव पवार यांनी केले. आभार प्रदर्शन शुभांगी वर्हाटे यांनी मानले. यावेळी पंचायत समितीचे अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

# शिव पाणंद शेतरस्ता चळवळीमुळे ग्रामविकासाची नवी दिशा – सरपंच

## राज्याला दिशादर्शक ठरलेल्या राळेगणसिद्धी - नारायणगव्हाण शिव रस्त्याच्या मजबुतीकरणाचा शुभारंभ



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०३, सुपा (अहिल्यानगर) :** अखेर शिव पाणंद शेतरस्ता चळवळीच्या ऐतिहासिक लढ्याला यश मिळाले असून, महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला गेला आहे. तमाम शेतकरी बांधवांच्या आशीर्वादाने ज्या राळेगणसिद्धी–नारायणगव्हाण शिवरस्त्याच्या संघर्षातून महाराष्ट्रातील शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचा जन्म झाला, त्या ऐतिहासिक रस्त्याच्या मजबुतीकरणाचे कामाचा शुभारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. हा केवळ एका रस्त्याचा शुभारंभ नसून हजारो शेतकऱ्यांच्या संघर्ष, त्याग आणि एकजुटीचा विजय आहे.यावेळी महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी राळेगणसिद्धी व नारायणगव्हाण ग्रामस्थांचे आभार मानत सांगितले की, या शिवरस्त्यामुळेच राज्यव्यापी चळवळ उभी करण्याची प्रेरणा मिळाली. पारनेर तालुक्यातून सुरू झालेला हा लढा आज राज्यभर पोहोचला असून, हजारो शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रभावी व्यासपीठ निर्माण झाले आहे. शेतरस्त्यांच्या प्रश्नावर शासनाकडून महत्त्वपूर्ण निर्णय मिळविण्यासाठी अनेक वर्षे सातत्याने संघर्ष करावा लागला.

या प्रवासात अनेक प्रशासकीय अडथळे, विलंब आणि मनस्ताप सहन करावा लागला. मात्र ॲड.प्रतिक्षा काळे यांच्या मोलाच्या सहकार्यामुळे न्यायालयीन लढ्याला यश मिळाले आणि न्यायाचा मार्ग मोकळा झाला. यावेळी शरद पवळे यांनी आपला संकल्प पुन्हा एकदा व्यक्त करत सांगितले,माझा रस्ता होवो अथवा न होवो, जोपर्यंत माझ्या शेवटच्या शेतकरी भावाला दर्जेदार शेतरस्ता मिळत नाही, तोपर्यंत मी थांबणार नाही.त्यांनी पुढे सांगितले की, स्वतः चा प्रश्न सुटला म्हणून संघर्ष थांबविणार नाही. राज्यातील प्रत्येक गरजवंत शेतकऱ्याला न्याय मिळवून देण्यासाठी नव्या जोमाने काम सुरू राहील. आज अनेक तालुके व जिल्ह्यांमध्ये शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे पदाधिकारी निस्वार्थ भावनेने कार्य करत असून शेतकऱ्यांच्या हक्काच्या रस्त्यांसाठी लढा देत आहेत. याप्रसंगी सरपंच जयसिंगभाऊ मापारी यांनी कामाची प्रत्यक्ष पाहणी करून दर्जेदार व टिकाऊ रस्ता उभारण्याचे आश्वासन दिले. त्यांनी सांगितले की, शिव पाणंद शेतरस्ता चळवळीमुळे ग्रामीण भागातील विकासाला नवी दिशा मिळाली असून शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी अशा उपक्रमांना ग्रामपंचायतीची पूर्ण साथ राहील.

राळेगणसिद्धी - नारायणगव्हाण शिवरस्त्याच्या मजबुतीकरणामुळे परिसरातील शेतकऱ्यांना दळणवळणाची अधिक चांगली सुविधा उपलब्ध होणार असून, हा रस्ता राज्यातील शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रेरणास्थान म्हणून कायम स्मरणात राहणार आहे.यावेळी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी ही शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास राळेगणसिद्धीचे सरपंच जयसिंगभाऊ मापारी, उपसरपंच संपतराव उगले, भाऊसाहेब गाजरे, संभाजी गाजरे, विजय गाजरे, शरद मापारी, गणेश पठारे, रुपेश फटांगडे, सागर पठारे, सोमनाथ फटांगडे तसेच शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे राज्य प्रसिद्धीप्रमुख रविंद्र खुडे, विजय शेलार, दशरथ वाळूंज, बबन गुंड, संजय साबळे आदी मान्यवर उपस्थित होते. शेत तिथे रस्ता – गाव तिथे समृद्धी या संकल्पनेला प्रत्यक्ष आकार देणारा हा ऐतिहासिक क्षण शेतकरी चळवळीच्या इतिहासात प्रेरणादायी ठरणार आहे.

### जिंतूर महिला बाजार २०२६ ला उत्स्फूर्त प्रतिसाद; महिला उद्योजिकांना व्यासपीठ

**अक्षराज : रहीम कोक्कर**




**दि.०३, जिंतूर :** महिला उद्योजिकांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्या व्यवसायाला चालना मिळावी या उद्देशाने परवाज फाउंडेशन, परभणी यांच्या वतीने जिंतूर महिला बाजार २०२६ या विशेष प्रदर्शन व विक्री महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. मौलाना हुसेन अहमद मदनी कम्युनिटी हॉल, जिंतूर येथे आयोजित या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.कार्यक्रमाचे उद्घाटन नगराध्यक्ष प्रताप भैय्या देशमुख यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून गटनेते मुन्ना भैय्या गोरे

उपनगराध्यक्ष मोहसीन खान पठाण, नगरसेवक शेख मोहम्मद अथर, मुन्ना सर तसेच नगरसेवक सचिन उर्फ मुन्ना गोरे उपस्थित होते.या प्रदर्शनामध्ये विविध महिला उद्योजिकांनी आपल्या हस्तकला, गृहउद्योग, खाद्यपदार्थ, कपडे, सौंदर्यप्रसाधने व इतर उत्पादनांचे स्टॉल उभारले होते. महिलांना स्वतःच्या उत्पादनांचे प्रदर्शन आणि विक्रीसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम स्तुत्य असल्याचे उपस्थित मान्यवरांनी सांगितले.कार्यक्रमाच्या आयोजक तथा परवाज फाउंडेशनच्या अध्यक्षा मोहम्मदी परवीन खान यांनी महिला सक्षमीकरणासाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखित करत भविष्यातही महिलांसाठी विविध उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला.महिला उद्योजिकांच्या आत्मविश्वासाला बळ देणारा आणि त्यांच्या व्यवसायवृद्धीसाठी प्रेरणादायी ठरणारा हा उपक्रम जिंतूर शहरात चर्चेचा विषय ठरला आहे.

# एसटीचा वक्तशीरपणा आणि नियमितता वाढीसाठी प्रभावी उपाययोजना राबविणार - परिवहन मंत्री सरनाईक

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०३, मुंबई :** राज्यातील लाखो प्रवाशांसाठी एसटी ही केवळ वाहतुकीची सेवा नसून जीवनवाहिनी आहे. त्यामुळे एसटी बसेस वेळेवर आणि नियमित धावणे ही प्रवाशांची मूलभूत अपेक्षा असून त्यात कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही. एसटी बसेसचा वक्तशीरपणा आणि नियमितता वाढविण्यासाठी महामंडळ स्तरावर प्रभावी उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. या संदर्भात आज बैठक पार पाडली.

महामंडळामध्ये बसेसच्या वेळेच्या नियोजनासाठी 'इशू अँड स्टार्ट' ही कार्यपद्धती लागू आहे. या पद्धतीनुसार प्रत्येक बस तिच्या नियोजित सुटण्याच्या वेळेपूर्वी किमान दहा मिनिटे आधी संबंधित फलाटावर उभी असणे आवश्यक आहे. तसेच बस फलाटावर आल्यानंतर संबंधित वाहकाने नियोजित वेळेपूर्वी किमान ५ प्रवाशांची तिकिटे निर्गमित करणे अपेक्षित आहे. या प्रक्रियेमुळे बसच्या वक्तशीरपणाचे तांत्रिक मूल्यमापन करणे शक्य होते.

एखादी बस वेळेवर सुटल्यास तिच्या पुढील सर्व फेऱ्याही वेळेवर होण्यास मदत होते. यामुळे प्रवाशांचा एसटीवरील विश्वास वाढतो आणि प्रवासी संख्येतही वाढ होते. विशेषतः पहाटे ५ ते सकाळी १० या कालावधीत बसस्थानकांवरून सुटणाऱ्या सर्व बसफेऱ्या १०० टक्के नियमित आणि वेळेवर सुटल्या पाहिजेत, यासाठी सर्व विभागीय नियंत्रक, आगार व्यवस्थापक, वाहतूक निरीक्षक आणि संबंधित अधिकाऱ्यांनी विशेष दक्षता घ्यावी, असे



निर्देश दिले.

सकाळच्या सत्रातील अनेक बसफेऱ्या चालक अथवा वाहक वेळेवर हजर न राहिल्यामुळे उशिरा सुटत असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे यापुढे बसेसच्या वक्तशीरपणावर अधिक प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी बसस्थानकांवरील सीसीटीव्ही यंत्रणा, वाहकांचे अहवाल आणि उपलब्ध डिजिटल नोंदींचा वापर करण्यात येणार आहे. बसेस वेळेवर सुटल्या अथवा उशिरा सुटल्या याची पडताळणी करून ज्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे बस उशिरा सुटल्याचे आढळेल, त्यांच्यावर त्याच दिवशी जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात येईल. एसटी सेवेची विश्वासार्हता वाढविण्यासाठी आणि प्रवाशांना दर्जेदार सेवा देण्यासाठी वक्तशीरपणा यालाच सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जबाबदारीची जाणीव ठेवून काम करणे आवश्यक आहे, असे आवाहन केले.

### मालाडमध्ये जागतिक दर्जाचे 'मीडिया हब' उभारण्यासाठी कंपनी स्थापन करण्यात येणार - मुख्यमंत्री

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०३, मुंबई :** मालाड येथील आकाशवाणी (प्रसार भारती) च्या जागेवर जागतिक दर्जाचा 'एकात्मिक चित्रपट आणि दूरदर्शन मीडिया हब' उभारण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि प्रसार भारती यानी संयुक्तपणे विशेष उद्देश कंपनी (एसपीव्ही) स्थापन करण्यास आज मुख्यमंत्री देवेंद्र यांनी मान्यता दिली.

प्रसारभारती समवेत झालेल्या सामंजस्य करारासंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. सांस्कृतिक कार्य विभागाचे मंत्री ॲड.आशिष शेलार, प्रसार भारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ आणि एमआयडीसी चे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, सध्या या जागेवर एनडीझेड आणि सीआरझेडचे नियम लागू असल्याने केवळ मर्यादित क्षेत्रावर विकास शक्य आहे. संपूर्ण विकास करण्यासाठी आवश्यक वैधानिक परवानग्या, नियमांमधील बदल आणि विकास नियंत्रण नियमावलीतील सुधारणा कराव्या लागणार आहेत. यासंदर्भात राज्य शासनाकडून आवश्यक ते सर्व सहकार्य उपलब्ध करून दिले जाईल.

या संयुक्त विकासासाठी पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करण्याकरिता प्रकल्पाचा पूर्व–व्यवहार्यता अभ्यास आणि कृती आराखडा तयार करण्यासाठी सल्लागार संस्थेची नियुक्ती करून डीपीआर आणि तांत्रिक बाबींना गती देण्यासाठी दोन्ही संस्थांच्या अधिकाऱ्यांची संयुक्त कार्यसमिती स्थापन करावी. तसेच जून महिन्याच्या अखेरपर्यंत प्रकल्पातील सर्व घटक आणि विकास आराखडा अंतिम करण्याचेही निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. मालाड येथील प्रसार भारतीच्या एकूण २७८ एकर जागेपैकी सुमारे १५० एकर क्षेत्रावर चित्रपट नगरीसोबत संयुक्त विकास प्रस्तावित आहे. या प्रकल्पासाठी प्रसार भारती, एमआयडीसी आणि महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला होता. आकाशवाणीचे बहुतांश प्रसारण एफएम प्रणालीवर स्थलांतरित होत असल्याने उपलब्ध जागेचा प्रभावी वापर मीडिया व मनोरंजन क्षेत्राच्या विस्तारासाठी करण्यात येणार आहे.

या प्रस्तावित मीडिया हबमध्ये अत्याधुनिक चित्रपट स्टुडिओ, साऊंड स्टेजेस, हॉस्पिटॅलिटी, आयटी व आयटीईएस क्षेत्राशी संबंधित सुविधा, पर्यटन विकास प्रकल्प; तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाची फिल्म आणि संगीत प्रशिक्षण केंद्रे उभारण्यात येणार आहेत. यासाठी परदेशातील नामांकित शैक्षणिक संस्थांशी सहकार्य करण्यात येणार आहे.

# ०६ जुलैला ठाणे महापालिका लोकशाही दिनाचे आयोजन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, ठाणे :** ठाणे महापालिकेचा पुढील लोकशाही दिन सोमवार, ०६ जुलै, २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. नागरिकांनी जुलै महिन्याच्या लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी म्हणजेच २२ जुन पर्यंत त्यांचे अर्ज-निवेदने महापालिका भवन, नागरी सुविधा केंद्र येथे दोन प्रतीत सादर करावेत. निवेदन दाखल करताना अर्जदाराने प्रत्येक निवेदना सोबत प्रपत्र-१ (ब) सादर करणे आवश्यक आहे. प्रपत्र-१ (ब) नागरी सुविधा केंद्र येथे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र. प्रसुधा-१०९९/सीआर-२३/९८/१८-अ, दिनांक २६ सप्टेंबर २०१२ नुसार माहे डिसेंबर- २०१२पासून लोकशाही दिनाच्या दिवशी नागरिकांचे निवेदन न स्विकारता, हे निवेदन दोन प्रतीत लोकशाही दिनाच्या १५ दिवस आधी महापालिका कार्यालयात सादर करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. मुख्यालयातील या लोकशाही दिनामध्ये, परिमंडळ लोकशाही दिनात ज्या नागरिकांनी आपली निवेदने सादर केलेली आहेत, तसेच ज्या निवेदनावर १ महिन्यापर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नाही, अशाच निवेदनांचा स्वीकार करण्यात येईल.